# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२३/प्र.क्र. २९४/प्रनिप्रा/२४ जानेवारी/२०२४/२५६ दिनांक : ९/२/२३

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **७५व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथील दिनांक ८/११/२०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ व २) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ यांची प्राधिकरणावरील रिक्त पदांवर अशासकीय सदस्य म्हणुन उर्वरित पदावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक ९/११/२०२३ रोजीचे पत्र प्राधिकरणास दिनांक १/१२/२०२३ रोजी प्राप्त झाले.

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ, डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी (दूरदृष्यप्रणालीद्वारे), व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत ईमेलद्वारे कळविले आहे. तसेच डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई आणि डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७४व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७४व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

**विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या क्रमांक ७४व्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७४व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७४व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी झालेल्या ७४ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक २७/१२/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |
| २. | ३ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५)(४) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा व तद्नुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे (अहवाल सादर करण्यात आला आहे) |
| ३. | ५ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्यात आलेल्या ०४ महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी उपसमितीचा दिनांक ८/११/२०२३ रोजीचा अहवाल प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर | कार्यवाही करण्यात येत असून पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. |
| ४. | ६ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ४, ९ व १० नुसार शैक्षणिक वर्षाच्या सामाईक प्रवेश परीक्षा / केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया / प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया / प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा तपशील / पुनर्विलोकन याचिका अर्जाची प्रक्रिया याकरिता ऑनलाईन / ऑफलाईन (सध्या अस्तित्वात असलेली व प्रस्तावित पध्दतीने) राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचा आढावा अवलोकनार्थ सादर. | या संदर्भात सीईटी कक्षाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.<br><br>*पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.* |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ५. | ७(क) | शैक्षणिक २०२१-२२ मधील डॉ. तानाजीराव चोरगे अध्यापक महाविद्यालय (बी.एड), रत्नागिरी मधील ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत विद्यापीठास कळविलेले दिनांक १९/१०/२०२३ रोजीचे पत्र अवलोकनार्थ व मान्यतेबाबत | प्राधिकरणाचे निर्णय संबंधितांना दिनांक २९/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ६. | ७(ख) | रिझवी विधी महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता मिळण्याबाबत. | प्राधिकरणाचे निर्णय संबंधितांना दिनांक ९/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ७. | ७(ग) | सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, अंधेरी शासकिय अनुदानित महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीतील त्रुटीची पूर्तता प्रकरणी दंड माफ करणेबाबत. | प्राधिकरणाचे निर्णय संबंधितांना दिनांक १६/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ८. | ७(घ) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयांनी सादर केलेल्या उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व इतर संचालनालकांच्या फेरपडताळणी अहवालानुसार पात्र प्रवेशांना मान्यता देण्याबाबत. | याबाबत कार्यवाही सुरु असून प्रकरणे मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे. उर्वरित प्रकरणे पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. |
| ९. | ७(ङ) | मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट विधी महाविद्यालय, नवी मुंबई या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष अभ्यासक्रमाचे प्रवेश मान्यता प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत. | या संदर्भात महाविद्यालयास दिनांक १६/०१/२०२४ रोजीच्या ईमेलद्वारे माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. माहिती प्राप्त झालेली असून, लवकरच मान्यता पत्र निर्गमित करण्यात येईल. |
| १०. | ७(च) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. | प्राधिकरणाचे निर्णय सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे. |
| ११. | ७(ज) | MAHA DBT साठी API तयार करण्याबाबत. | MAHA DBT साठी API करिता रु. ५०/- फी शुल्क आकारण्याबाबत लागणारे आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत. |
| १२. | ७(झ) | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षांच्या वॉर रुमचे मानधन, केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियांचे मानधन तसेच दिवाळी सानुग्रह अदा करण्याबाबत अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर | प्राधिकरणाच्या निर्णयान्वये कार्यवाही करण्यात आलेली नसून प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार मानधन पुढील बैठकीपूर्वी अदा करण्यात येईल. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १३. | ७(त्र) | श्री.दिपक भातुसे, वाहनचालक यांच्या अनुपस्थितीत श्री. विलास तांबे, शिपाई यांना वाहनचालक या पदाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्याबाबत | प्राधिकरणाच्या निर्णयान्वये दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या पत्राने कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| १४. | ७(ट) | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामध्ये उपस्थित राहणाऱ्या अभ्यागत यांचे मोबाईल रिसेप्शन येथे जमा करणेबाबत. | प्राधिकरणाच्या निर्णयान्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| १५. | ७(ठ) | गोदिंया होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, गोंदिया येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. मिताली कारेमोरे यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी. | प्राधिकरणाच्या निर्णयान्वये दिनांक १२/१२/२०२३ रोजीच्या पत्राने कार्यवाही करण्यात आलेली आहे. |

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण कार्यालयाद्वारे केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेऊन मान्य करण्यात आला.

**विषय क्रमांक ३ : महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५)(४) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केद्रींभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा व तद्नुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा.**

या बाबत माहिती निरंक असल्याचे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले.

**विषय क्रमांक ४ : सीईटी कक्षाच्या "Creating learning / testing centres in Maharashtra for Strengthening of Common Entrance Test Cell infrastructure" या प्रस्तावाच्या मान्यतेबाबत.**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत उभारण्यात येणाऱ्या "Creating learning / testing centres in Maharashtra for Strengthening of Common Entrance Test Cell infrastructure" बाबत सादर केलेला दिनांक १८/०१/२०२४ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली व शासनाच्या नियमाप्रमाणे व विहित कार्यपध्दतीनुसार निविदेची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असल्याचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सांगितले, तद्नुषंगाने खालील अटी/शर्तीच्या अधीन राहुन आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर कलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली,-

i. या प्रस्तावातील संगणक व इतर साहित्य खरेदी करताना शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.
ii. परिक्षा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यप्रणाली सक्षम करणे,
iii. प्रक्रिया विहित पध्दतीने व सुरळीत करण्याकरिता SoP तयार करणे,

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

iv. कार्यपध्दती पूर्ण करण्यकारिता वेळापत्रक / कालावधी निश्चित करावी.
v. प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने करण्याकरिता सामज्यंस करार (MoU) तयार करुन प्राधिकरणास सादर करावा.
vi. संपूर्ण प्रक्रियेचा त्रैमासिक अहवाल वेळोवेळी अद्यावत करुन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.
vii. प्रस्तूत प्रकरणी सर्व आवश्यक माहिती वेळोवेळी प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांना सादर करणे आवश्यक राहील.
viii. प्राधिकरणाच्या सदस्यांनी सदरील केंद्राना भेट देण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही सीईटी कक्षाकडून करण्यात यावी.

**विषय क्रमांक ५ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर तंत्र शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारितीतील महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय प्राप्त झालेल्या अहवालांचे अवलोकन करण्यात आले व तद्नुषंगाने निर्देश देण्यात आले,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

२) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजी च्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. सबब याबाबत नोंद घेण्यात आली.

३) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

४) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये उपसमिती गठित करण्यात आली आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

५) अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावातील प्रवेशित माहिती व ऑनलाईन संगणक प्रणालीमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती तसेच काही प्रकरणी संचालकांचा तपासणी अहवाल यामध्ये तफावत दिसून आली. सदर प्रकरणी संबंधित सेवा पुरवठादार व संचालक यांच्याकडून माहिती अद्यावत करुन पुढील मान्यतेबाबतची प्रक्रिया पुर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

६) अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत व प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम <u>(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय)</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तथापि, ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहे. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

७) तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी उपसमितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि सदरील अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

८) प्रस्तूत प्रकरणी वरील परिच्छेद क्रमांक (७) मध्ये नमूद केल्यानुसार १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे <u>(प्रपत्र-अ)</u>, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार) कार्यवाही करावी.

<u>विषय क्रमांक ६:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

(क) <u>शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास एस.बी जैन इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज अॅन्ड रिसर्च, नागपुर येथे प्रवेशित कु.शुभांगी शिवराज कोंडे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. (याचिका क्रमांक ५५९६/२०१९)</u>

एस.बी. जैन ईन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी, मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च, नागपूर या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शुभांगी शिवराज कोंडे या विद्यार्थिनीने विहीत मुदतीतील जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने मान्यता देण्यात आली नव्हती.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

त्याअनुषंगाने, सदर प्रकरणी संबंधीत महाविद्यालयास दिनांक ०७/०१/२०२१ रोजी सुनावणी देण्यात आलेली होती. तसेच सदर सुनावणीचे दिनांक २२/१०/२०२१ रोजीचे आदेशान्वये सदर याचिका फेटाळण्यात आली होती. त्याअनुषंगाने, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सदर विद्यार्थिनीच्या प्रवेशाबाबत दिनांक ६/१२/२०२२ रोजी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

> "सदर प्रकरणी विद्यार्थ्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. करिता सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे."

कु.शुभांगी शिवराज कोंडे, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थिनीने जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेली याचिका क्र.५५९६/२०१९ मधील मा. न्यायालयाचे दिनांक १२/०९/२०२३ रोजीचे खालीलप्रमाणे आदेश प्राप्त झाले.

> "6. For aforesaid reasons, the order passed by the Scrutiny Committee dated 12.06.2019 is set aside. It is declared that the petitioner has proved that she belongs to 'Telangi' Nomadic Tribe-C category. Within a period of four weeks from today, the Scrutiny Committee shall issue validity certificate to the petitioner. The respondent no.5 shall regularize the petitioner's admission in the Nomadic Tribe-C category in the light of aforesaid declaration. The respondent nos.3 and 4 to take further necessary steps in accordance with the aforesaid declaration."

उपरोक्त आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे पुर्तता करण्याबाबत संबंधीत महाविद्यालयास कळविण्यात आले. त्याअनुषंगाने, महाविद्यालयाने दिनांक १४/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कु. शुभांगी शिवराज कोंडे या विद्यार्थिनीचे Nomadic Tribe-C चे दिनांक ७/१२/२०२३ रोजीचे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थिनी कु.शुभांगी शिवराज कोंडे, यांचा प्रवेश LOPENO या जागेवर झालेला असून त्यांनी Nomadic Tribe-C चे दिनांक ७/१२/२०२३ रोजीचे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले असल्याने सदर विद्यार्थिनीच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ख) <u>युनिवर्सल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, मुंबई या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रथम व द्वितिय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यता प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत.</u>

युनिवर्सल कॉलेज ऑफ इंजिनियरींग, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यते प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्राधिकरणाचे प्रवेश मान्यतेचे कामकाज ऑनलाईन पोर्टल वर चालू होते. सदर महाविद्यालयाने ऑनलाईन पोर्टलवरील प्रक्रिया केलेली दिसून येत नाही. तसेच, सदर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव (ऑफलाईन) प्राधिकरणांस सादर केलेले नाहीत.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

याबाबत महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाचे प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेली पावती व संचालकांचा दिनांक ८/१०/२०१८ रोजीचा पडताळणी अहवाल सोबत जोडुन प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

संचालकांच्या पडताळणी अहवालाच्या अनुषंगाने, सदर महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे,-

| Sr. No. | Name of the Institute | Institute Code | Sanction Intake | Total No. of Admissions Done | Total No. of Admissions for Approval | Total No. of Admissions with Discrepancies |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Universal College of Engineering, Kaman, Dist. Thane | EN-3460 | 420 | 250 | 249 | 01 |
| | | DSE-3460 | - | 217 | 214 | 03 |

प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेश मान्यता प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

"प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता व संचालनालयाने सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. तथापि महाविद्यालयाकडून झालेली दिरंगाई व बेजबाबदारपणा बाबत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांना प्रत्येकी रु. ५ लाख व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र व दंडाची रक्कम सादर केल्यानंतर संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात येतील. याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी."

वरील बाबी विचारात घेता युनिवर्सल कॉलेज ऑफ इंजिनियरींग, मुंबई या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता वरील तालिकेमध्ये नमूद केल्यानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रस्तूत प्रकरणी 'प्रवेश मान्यता प्रस्ताव' सादर करण्याबाबत महाविद्यालयाकडून झालेल्या दिरंगाई/निष्काळजीपणा ही गंभीर बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालयास प्रति अभ्यासक्रम/प्रस्ताव रु. ६ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम कॉलेज ऑफ एज्युकेशन, परभणी महाविद्यालयाच्या बी.एड अभ्यासक्रमातील मान्यतेबाबत प्राधिकरणाच्या निर्णयानुसार महाविद्यालयास रुपये १ लाख दंड माफ करण्याबाबत.</u>

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम कॉलेज ऑफ एज्युकेशन, परभणी येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता बी. एड. अभ्यासक्रमातील प्रवेश मान्यतेबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(ग) अन्वये घेतलेल्या निर्णयाबाबत महाविद्यालयाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणी पुर्नविचार करुन महाविद्यालयास आकारण्यात आलेल्या दंडात्मक कार्यवाही क्षमापित करण्यात येत आहे.

(घ) <u>मा.प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अर्जनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर.</u>

प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता सोबत जोडलेल्या <u>प्रपत्र- ब</u> मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा ही गंभीर बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालयास <u>प्रपत्र-ब मध्ये नमूद केल्यानुसार</u> दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच या संदर्भात उर्वरित प्रकरणे प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ङ) <u>श्री. मोहन विष्णू तांबे यांच्या दिनांक २९/१२/२०२३ रोजीच्या मुदतवाढ व मानधन वाढ मिळणेबाबत अर्जावर निर्णय घेणे</u>

विषयांकित प्रकरणी कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावांवर सांगोपांग चर्चा करण्यता आली असून श्री. मोहन विष्णू तांबे, सेवानिवृत्त वरिष्ठ स्वीय सहाय्यक यांच्या सेवा दिनांक १/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ पर्यंत करार पध्दतीने मुदतवाढ व रु. ९०,०००/- इतके मासिक मानधन वाढ करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 9/2/24